सदस्य
विधान परिषद

सत्यमेव जयते

हरिभाऊ राठोड
आमदार (MLC)
माजी खासदार
लोक सभा
मोवाईल: ९९२०७१६९९९
टेली फॅक्स: ०२२ २५६८६६९९

## प्रसिद्धी पत्रक

दि.१५/११/२०१७

## बढती मधील आरक्षण आणि गोंधळाची स्थिती, या मुद्यावर भाजप सरकार डुबणार

मागासवर्गीय कर्मचारी अधिकाऱ्यांना बढती मधील आरक्षणाचा सर्वोच्च न्यायालयाच्या एम.नागराजन प्रकरणी आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या विजय घोगरे, महाराष्ट्र प्रकरणी बढती मधील आरक्षणाला रोख तर लावलीच आहे परंतु गेल्या 10 वर्षा मध्ये कर्मचारी अधिकाऱ्यांना मिळालेल्या बढत्या रद्द करून त्यांना पदावन्नत करण्यात यावे, असे मुंबई उच्च न्यायालयाने आदेश दिले होते , आणि सर्वोच्च न्यायालया मध्ये अपील करण्यासाठी तीन महिन्यांची मुदत दिली होती, ती मदतही संपली आहे, आज दि १५ नोव्हेंबर ला सर्वोच्च न्यायालयात या प्रकरणी लार्जर बेंच ( संविधान पीठ) समोर सुनवाई करण्यात येईल असे स्पष्ट करण्यात आले.

बढती मधील आरक्षण, एम नागराजन प्रकरणी दिलेले निकाल बरोबर आहे कि चूक हे लवकरच याबाबतीत सर्वोच्च न्यायालयात निकाल लागेल. त्या दिवशी संपूर्ण दिवस या बाबतीत युक्तिवाद होईल व या नंतर या प्रकरणी निकाल देण्यात येईल. न्यायालयाच्या निर्णयामुळे सर्वत्र गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली असून, केवळ महाराष्ट्र नव्हे तर मध्यप्रदेश राजस्थान,कर्नाटक,आणि उत्तर प्रदेश येथील हजारो कर्मचारी पदावन्नत करण्यात आल्या मूळे सर्वत्र चिंतेचे वातावरण असून हळूहळू संविधानात तरतूद करून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी जे नोकरी आणि शिक्षणामध्ये आरक्षण दिले आहे ते हळूहळू काढून घेतील काय ? अशी भीती मागासवर्गीय घटकामध्ये निर्माण झालेली आहे, जर सरकारनी तातडीने घटना दुरुस्ती केली नाही तर ,ह्याच मुद्यांवर भाजप सरकार डुबल्या शिवाय राहणार नाही. बढती मधील आरक्षण बंद झाल्यास तोच अर्थ भरती मध्ये लावल्या जाईल भीती अशी निर्माण होत आहे की, न्यायालयाच्या माध्यमातून जर हे सरकार चालत असेल, आणि सविधानामध्ये तातडीने दुरुस्ती करण्याचे टाळत असेल तर, हाच नियम आणि निकष मागासवर्गीयांच्या भरती प्रकरणी लागू शकतो ,त्यामुळे संपूर्ण आरक्षण बंद करावे लागेल. एम.नागराजन प्रकरणी अनेक प्रश्न उपस्थित होतात , या बढतीच्या आरक्षण प्रकरणी त्या मागासवर्गीय अधिकारांचा काय दोष? सविधानाच्या या संदर्भाच्या तरतुदी प्रमाणे म्हणजेच कलम 16(4) ब अनुसार त्यांना बढती दिली सर्वोच्च न्यायालयाने इंद्रा सहानी प्रकरणी निकाल देताना आरक्षण हे 50% च्या वर जाता कामा नये, अशी अट घातली तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या साबरवाल प्रकरणी बढती मध्ये आरक्षण देतांना जर विहित टक्केवारी भरती असेल तर, प्रमोशन साठी आरक्षण देता येत नाही, असे सर्व निर्बंध सरकार पाळत आले आहे,असे असतांना वेगळा निष्कश काढून एकूणच आरक्षण बंद करण्याचा केविलवाणा प्रयत्न कशासाठी,



E-mail : haribhaurathod@gmail.com • Website: www.haribhaurathod.com
मुंबई : ए-२०१, बंजारा हिल, बाबासाहेब नाईक सोसायटी, अशोक नगर पोलीस स्टेशन जवळ, मुलुंड (वेस्ट), मुंबई-८० टेली- 25686699 मोबाईल : 09868180458, 09920716999
यवतमाळ : अश्विनी टॉवर, दारव्हा रोड, यवतमाळ, महाराष्ट्र - ४४५००१. टेली - 07232-256333, 240570

सदस्य
विधान परिषद
सत्यमेव जयते
हरिभाऊ राठोड
आमदार (MLC)
माजी खासदार
लोक सभा
मोबाईल: ९९२०७१६९९९
टेली फॅक्स: ०२२ २५६८६६९९

*सर्वोच्च न्यायालयाचे निष्कर्ष*

एम.नागराजम प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने आपले निष्कर्ष काढतांना काय म्हटले, हे बघणे आवश्यक आहे. निष्कर्षात म्हटले आहे की, ज्या संदर्भित घटना दुरूस्ती द्वारा घटनेमध्ये कलम 16(4) अ व 16(4)ब घातले गेलेत आहे, ती घटना दुरुस्ती घटनेच्या कलम 16(4) मधूनच उत्पन्न झाली आहे. घटनेच्या कलम 335 या अंतर्गत राज्यशासनाची कार्यक्षमता ध्यानात घेऊन राज्य शासनाला ज्या घटका मुळे आरक्षणाची तरतूद करता येते ते घटक किंवा कारणे या घटना दुरुस्ती मुळे कायम राहते. कारणे किंवा घटक म्हणजे मागासलेपणा व पुरेसे प्रतिनिधित्व नसणे. ज्या संदर्भित घटना दुरुस्ती द्वारा घटनेत सदर 16(4)अ व 16(4) ब घातले गेलेत आहे, ती घटना दुरुस्ती घटनेच्या कलम 16 (4) संरचना बदलत नाही. सदर संदर्भित घटना दुरुस्त्या फक्त अनुसूचित जाती,व अनुसुचित जमाती पुरत्याच मर्यादित आहेत त्या मुळे घटनेची कोणतेही प्रावधाने नाश पावत नाहीत किंवा लोप पावत नाहीत.

*राज्य शासनाने स्वतःचे व न्यायालयाचे समाधान करावे*

वरील प्रमाणे निष्कर्ष काळजीपूर्वक अवलोकन केल्या नंतर ते स्पष्ट होते की राज्याने पुढील बाबीचा अभ्यास करून स्वतःचे समाधान करावे की, 50% ची मर्यादा, क्रिमिलियर ची संकल्पना तसेच मागासलेपण, प्रशासना मध्ये पुरेसे प्रतिनिधित्व नसणे,व प्रशासकीय कार्यक्षमता बाधित होणार नाही, हे बघावे लागेल स्वतःचे समाधान होईल याची निश्चिती करावी लागेल, आणि न्यायालयाला सादर करून त्यांचेही समाधान करावे लागेल.

*भीतीचे वातावरण*

आता मागासवर्गीया मध्ये भीती अशी निर्माण झाली आहे की, केंद्रात व राज्यात भाजप सरकार असल्या मुळे मागासवर्गीयाचे आरक्षण बंद होणार की काय? मागील आठवड्यात उत्तर प्रदेशातील पंधरा हजार पेक्षा जास्त कर्मचारी अधिकाऱ्यांना पदावन्नत करण्यात आले, सहा महिन्यापूर्वी मध्य प्रदेशात सुद्धा पाच हजार पेक्षा जास्त कर्मचारी अधिकाऱ्यांना पदावन्नत करण्यात आले, जर सर्वोच्च न्यायालयात मुंबई उच्च न्यायालयाचा निकाल रद्दबादल केले नाही तर, तोच धागा पकडून महाराष्ट्रातील जवळपास 25 हजार कर्मचाऱ्यांना पदावन्नत करावे लागेल, असे झाले तर सरकारला हे महागात जाईल, या मुद्यावर 2019 साठी सरकार डुबल्या शिवाय राहणार नाही.त्या पेक्षा लवकरात लवकर घटना दुरुस्ती करावी, लोकसभेचे अधिवेशन सध्या चालू नाही, म्हणून सरकारनी वटहुकूम जारी करावा अशी आमची मागणी आहे.

**मा.संपादक/प्रतिनिधी,**

**वरील वृतास आपल्या दैनिकातून प्रसिद्धीस द्यावे, हि विनंती**

आपला,

हरिभाऊ राठोड

वि.प.स



E-mail : haribhaurathod@gmail.com • Website: www.haribhaurathod.com

मुंबई : ए-२०१, बंजारा हिल, बाबासाहेब नाईक सोसायटी, अशोक नगर पोलीस स्टेशन जवळ, मुलुंड (वेस्ट), मुंबई-८० टेली- 25686699 मोबाईल : 09868180458, 09920716999
यवतमाळ : अश्विनी टॉवर, दारव्हा रोड, यवतमाळ, महाराष्ट्र - ४४५००१. टेली - 07232-256333, 240570